संगणक सांकेतांक 201209011519502500

महाराष्ट्र शासन

महिला व बाल विकास विभाग

[illegible]

[illegible]

[illegible]

दिनांक- [illegible]

[illegible]

"[illegible]"

(१) [illegible]

(२) [illegible]

(३) [illegible]

(४) [illegible]

(५) [illegible]

[illegible]

योजना क्र.१:- देवदासी किंवा तिच्या मुलीच्या विवाहासाठी अनुदान :-

(एक) [illegible]

[illegible]

(१) [illegible]

(२) [illegible]

(३) [illegible]

(४) [illegible]

(५) [illegible]

(दोन) अर्ज करण्याची व अनुदान मंजुरीची कार्यपध्दती

(१) संबंधित लाभधारकाने विहीत नमुन्यातील अर्ज संबंधीत जिल्हा महिला व बाल विकास अधिकाऱ्याकडे सर्व कागदपत्रांसह विवाहापूर्वी एक महिना अगोदर सादर करावा किंवा विवाहानंतर ६० दिवसाच्या आतही अर्ज सादर करता येईल.

(२) संबंधीत जिल्हा महिला व बाल विकास अधिकाऱ्यांनी अर्जाची छाननी करुन आवश्यक शिफारशीसह व निरीक्षण अहवालासह प्रस्ताव आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे, महिला व बाल विकास यांना सादर करावा

(३) आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी अनुदान मंजूर करावे व अनुदान वितरण संबंधीत महिला व बाल विकास अधिकाऱ्यांनी करावे.

(४) विवाहापूर्वी आलेल्या अर्जावर संबंधित अधिकाऱ्यांनी स्वाक्षरीने खर्च नोंद करुन विवाहाप्रसंगी अनुदानाचे वितरण करावे.

(५) विवाह अनुदानानंतर परिविक्षा अधिकारी, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी [illegible] अहवाल सादर करावा.

(६) अर्जासोबत खालील दाखले जोडण्यात यावेत-

अ) देवदासी असल्याबाबतचा दाखला.

ब) जन्मतारखेचा दाखला.

क) महाराष्ट्रातील वास्तव्याचा दाखला

ड) विवाह नोंदणीचा दाखला.

इ) उत्पन्नाचा दाखला.

(चार) लेखाशिर्ष

या वरील खर्च मागणीशीर्ष-२२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२-समाजकल्याण-१०३, महिला कल्याण, तीन-स्तर योजना (१)(दो) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना -देवदासींच्या पुनर्वसनाच्या योजना (२२३५ २१९१), मागणी क्र.एक्स-१ या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकावा व मंजूर तरतूदीतून भागवावा.

योजना क्र-२ :- देवदासींना निर्वाह अनुदान :-

(एक) योजनेचे स्वरुप-

४० वर्षावरील देवदासींना दरमहा रुपये ३००/- (रुपये तीनशे फक्त) इतके निर्वाह अनुदान खालील अटींच्या अधिनतेने मंजूर करण्यात यावे.

(१) सदर अनुदान फक्त ४० वर्षावरील अविवाहीत देवदासींना (महिला) अनुज्ञेय राहील.

(२) अनुदान मंजुरीकरीता अर्जाचे नमुने, देवदासीचे प्रमाणपत्र, वयाचा दाखला, उत्पन्नाचा दाखला याबाबतीत आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सविस्तर सूचना द्याव्यात.

(दोन) देवदासी निर्वाह अनुदान

देवदासी निर्वाह अनुदानाचे सदर आदेश दि.१.१०.९७ पासून अंमलात येतील. त्यामुळे या आदेशापूर्वी ज्या देवदासींना शासन मार्फत निराधार अनुदान योजनेखाली अनुदान मिळत होते, त्यांचे त्या योजनेखालील अनुदान दि.१.७.९७ पासून बंद करावे व या योजनेखाली अनुदान चालू करावे. अर्जित देवदासींना त्यांची प्रकरणे ज्या महिन्यात मंजूर होतील त्या महिन्यापासून त्यांचे अनुदान चालू करण्यात यावे.

(तीन) अर्ज करण्याची व अनुदान मंजुरीची कार्यपध्दती

(१) संबंधित लाभधारकाने विहीत नमुन्यातील अर्ज संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकाऱ्याकडे सर्व कागदपत्रांसह सादर करावा.

(२) संबंधीत जिल्हा महिला व बाल विकास अधिकाऱ्यांनी अर्जाची छाननी करुन आवश्यक शिफारशीसह व निरीक्षण अहवालासह प्रस्ताव आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे, महिला व बाल विकास यांना सादर करावा

(३) आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी अनुदान मंजूर करावे व अनुदान वितरण संबंधीत महिला व बाल विकास अधिकाऱ्यांनी करावे.

(चार) लेखाशिर्ष

या वरील खर्च प्रधानशीर्ष-२२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२-समाजकल्याण-१०३, महिला कल्याण, तीन-इतर योजना (१७)-देवदासींना निर्वाह अनुदान (२२३५ २५०१), मागणी क्र.एक्स-१ या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकावा व मंजूर तरतूदीतून भागवावा.

योजना क्र.३:- देवदासींच्या मुला-मुलींना गणवेश व शालेय साहित्यासाठी अनुदान :-

(एक) योजनेचे स्वरुप

देवदासींच्या १ ली ते १० वी पर्यंतच्या मुला-मुलींना शिक्षणासाठी मदत होण्यासाठी खालीलप्रमाणे अनुदान देण्यात यावे

(१) क्रमिक पुस्तके	प्रतिविद्यार्थी	रु. ७५/-
(२) वह्या	प्रतिविद्यार्थी	रु. ७०/-
(३) इतर शालेय साहित्य	प्रतिविद्यार्थी	रु. ५०/-
(४) गणवेश (मुलांसाठी)	प्रतिविद्यार्थी	रु. १७५/-
(५) गणवेश (मुलींसाठी)	प्रतिविद्यार्थी	रु. २०५/-

(दोन) या अनुदानासाठी अटी व शर्ती खालीलप्रमाणे राहतील.

(१) सदर अनुदान वर्षातून एकदाच अनुज्ञेय राहील

(२) सदर अनुदान जिल्हा परिषदांच्या शाळा, महानगरपालिकांच्या शाळा तसेच मान्यताप्राप्त खाजगी शिक्षण संस्थांच्या शाळांमधील मुला-मुलींकरिताच अनुज्ञेय राहील.

(३) विद्यार्थी कोणत्या शाळेत कोणत्या इयत्तेत शिकत आहे याबाबत मुख्याध्यापकाचे प्रमाणपत्र आवश्यक राहील.

(तीन) अर्ज करण्याची व अनुदान मंजुरीची कार्यपध्दती

(१) संबंधित लाभधारकाने विहीत नमुन्यातील अर्ज संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकाऱ्याकडे सर्व कागदपत्रांसह सादर करावा.

(२) संबंधीत जिल्हा महिला व बाल विकास अधिकाऱ्याने अर्जाची छाननी करुन आवश्यक शिफारशीसह व विहीत अहवालासह प्रस्ताव आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे, महिला व बाल विकास यांना सादर करावा

(३) आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी अनुदान मंजूर करावे व अनुदान वितरण संबंधीत महिला व बाल विकास अधिकाऱ्यांनी करावे.

(चार) लेखाशिर्ष

या वरील खर्च प्रधानशीर्ष-२२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२-समाजकल्याण-१०३, महिला कल्याण, तीन-इतर योजना (१)(बी) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना -देवदासींच्या पुनर्वसनाच्या योजना (२२३५ १३११), मागणी क्र.एक्स-१ या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकावा व मंजूर तरतूदीतून भागवावा.

योजना क्र.४ :- देवदासींसाठी बीज भांडवल योजना

(एक) योजनेचे स्वरुप

कृषि व संलग्न उद्योग, ग्रामोद्योग, कुटीरोद्योग, लघुउद्योग, सेवा व इतर व्यवसाय अशा स्वरुपाचे उत्पन्न मिळविण्यासाठी देवदासींना खालील अटींच्या अधिन राहून राष्ट्रीयकृत बँकामार्फत रु.२५,०००/- (रुपये पंचवीस हजार फक्त) पर्यंतचे कर्ज घेता येईल.

(१) बँकेमार्फत कर्ज घेताना अर्जदारास भरावी लागणारी २५% रक्कम बीज भांडवल म्हणून शासनाकडून बँकेत भरण्यात यावी.

(२) शासनामार्फत बीज भांडवल म्हणून बँकेत भरलेल्या रकमेची परतफेड द.सा.द.शे.४% व्याजाने अर्जदाराने करणे आवश्यक आहे.

(३) अर्जदाराने बँकेच्या कर्जाची परतफेड बँकेच्या प्रचलित व्याजदरानुसार करावी.

(४) अर्जदाराने प्रथम बँकेच्या कर्जाची परतफेड करावी व त्यानंतर शासनाच्या बीज भांडवलाची परतफेड बँकेने ठरविलेल्या हप्त्यानुसार करावी.

(५) अर्जदार देवदासीचे वय १८ वर्षापेक्षा कमी नसावे.

(६) कर्जाचा अर्ज बँकेने मंजूर केल्यानंतर कर्ज मंजुरीची पत्रे संबंधित बँकेने पूर्ण केल्यानंतरच शासनाचे बीज भांडवल बँकेत जमा करण्यात येईल.

(७) अर्जदार महाराष्ट्राचा अधिकृत रहिवासी असला पाहिजे.

(दोन) अर्ज करण्याची कार्यपद्धती

(१) या योजनेंतर्गत संबंधीत बँकांच्या कर्ज योजनेनुसार विहीत नमुन्यातील अर्ज संबंधीत देवदासीने जिल्हा महिला बाल विकास अधिकाऱ्यामार्फत बँकेस सादर करावा.

(२) बँकेने कर्ज मंजुरीची कार्यवाही पूर्ण केल्यानंतर आयुक्तांच्या मान्यतेने बीज भांडवलाची रक्कम संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकाऱ्याने बँकेत जमा करावी.

(तीन) लेखाशिर्ष

या वरील खर्च प्रधानशिर्ष-२२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२ समाज कल्याण,८००-इतर खर्च-(बी) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (१)देवदासींच्या पुनर्वसनासाठी योजना (२२३५ ०२०१), मागणी क्र.एक्स-१ या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकावा व मंजूर तरतूदीतून भागवावा.

योजना क्र.५:- समाजप्रबोधनाचे कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना अनुदान

(एक) योजनेचे स्वरुप

देवदासी प्रथा नष्ट करण्यासाठी समाज प्रबोधनाचे कार्य प्रभावीपणे करणाऱ्या नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थांना वर्षभराच्या कार्यक्रमांसाठी रु.१०,०००/- (रुपये दहा हजार फक्त) इतके प्रोत्साहनपर अनुदान देण्यात यावे.

(दोन) या अनुदानासाठी अटी व शर्ती खालीलप्रमाणे राहतील.

(१) हे अनुदान वर्षातून एकदाच अनुज्ञेय राहील.

(२) देवदासी कल्याण अभ्यासगटाने देवदासींचे प्राबल्य असलेले दहा जिल्हे नमूद केले आहेत. या दहा जिल्ह्यातील प्रत्येकी ३ प्रमाणे एकूण ३० संस्थांना सदर अनुदान मंजूर करता येईल. (जिल्हे: कोल्हापूर, सांगली, सोलापूर, उस्मानाबाद, नांदेड, लातूर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पुणे व मुंबई.)

(३) या योजनेखाली अनुदानासाठी अर्ज करण्यापूर्वी संस्थेने देवदासी प्रथा निर्मूलनासाठी किमान तीन वर्षे समाजाचे प्रबोधन स्वरुपाचे कार्य केलेले असावे.

(४) सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० किंवा भारतीय संस्था नोंदणी अधिनियम, १८६० खाली संस्थेची नोंदणी झालेली असावी.

(५) मंजूर अनुदान केवळ देवदासी प्रथा निर्मूलनासाठी प्रसार व प्रचार कार्यक्रमांसाठीच वापरण्यात यावे व खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र खर्चाच्या तपशीलासह संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकाऱ्यांना द्यावे.

(६) एकदा मंजूर केलेल्या अनुदानाचे उपयोगिता प्रमाणपत्र मिळाल्याशिवाय नव्याने अनुदान मंजूर करण्यात येऊ नये.

(७) या योजनेखाली अर्ज करण्यासाठी संस्था अर्जाच्या तारखेपूर्वी ३ वर्षे अगोदर नोंदणी झालेली असावी.

(तीन) अर्ज करण्याची व अनुदान मंजुरीची कार्यपद्धती

(१) संबंधित स्वयंसेवी संस्थेने विहीत नमुन्यातील अर्ज संबंधीत जिल्हा महिला व बाल विकास अधिकाऱ्याकडे सर्व कागदपत्रांसह सादर करावा.

(२) संबंधीत जिल्हा महिला व बाल विकास अधिकाऱ्यांनी अर्जाची छाननी करून आपल्या शिफारशीसह व निरीक्षण अहवालासह प्रस्ताव आयुक्त, महिला व बाल विकास,महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सादर करावा.

(३) आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी अनुदान मंजूर करावे व अनुदान वितरण संबंधीत महिला व बाल विकास अधिकाऱ्यांनी करावे.

(चार) लेखाशिर्ष

या वरील खर्च प्रधानशिर्ष-२२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२-समाजकल्याण-१०३, महिला कल्याण, तीन-इतर योजना (१)(बी) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना -देवदासींच्या पुनर्वसनाच्या योजना (२२३५ १३९१), मागणी क्र.एक्स-१ या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकावा व मंजूर तरतूदीतून भागवावा.

योजना क्र.६:- वेश्यांच्या मुलां-मुलींकरिता वसतीगृह :-

(एक) योजनेचे स्वरूप :

वेश्यांच्या मुला-मुलींना शिक्षण घेण्यासाठी सुविधा उपलब्ध व्हावी म्हणून स्वयंसेवी संस्थामार्फत वसतीगृह सुरु करण्यास खालील अटींच्या अधिनतेने मान्यता देण्यात यावी-

(१) सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० किंवा भारतीय संस्था नोंदणी अधिनियम, १८६० खाली संस्था नोंदणीकृत असावी.
(२) संस्थेची आर्थिक स्थिती मजबूत असावी.
(३) या वसतीगृहात वेश्यांच्या मुला-मुलींव्यतिरिक्त अन्य प्रवर्गातील २०% मुला-मुलींना प्रवेश अनुज्ञेय राहील
(४) वसतीगृहातील मुला-मुलींना अन्न, वस्त्र, निवारा, क्रमिक पुस्तके, वह्या, शैक्षणिक साहित्य, गणवेश इ. संस्थेमार्फत पुरविण्यात याव्यात
(५) महाराष्ट्र राज्यातील सर्व स्तरावरील मान्य शासन मान्यता प्राप्त शैक्षणिक संस्थांमध्ये शिकत असलेल्या मुलांना वसतीगृहात प्रवेश देण्यात यावा.
(६) वेश्यांच्या अनौरस मुला-मुलींना या वसतीगृहात प्रवेश अनुज्ञेय राहील.
(७) वसतीगृहाची सामान्यतः क्षमता ७५ राहील.

(दोन) संस्थेला अनुदान

वसतीगृह चालविण्यासाठी स्वयंसेवी संस्थेला खालीलप्रमाणे अनुज्ञेय होणाऱ्या आवर्ती व अनावर्ती रकमेच्या ९०% इतकी रक्कम शासनाकडून अनुज्ञेय राहील व १०% संस्थेचा हिस्सा राहील.

(अ) <u>आवर्ती अनुदान</u>

(१) वसतीगृह चालविण्यासाठी स्वयंसेवी संस्थेला दरमहा दरडोई रु.४५०/- (रुपये चारशे पन्नास फक्त) इतके परिरक्षण अनुदान आणि औषधी व प्रासंगिक खर्चाकरिता दरमहा दरडोई रु.५०/- (रुपये पन्नास फक्त) इतके अनुदान अनुज्ञेय राहील.
(२) रु.४५०/- इतक्या परिरक्षण अनुदानामध्ये अन्न, वस्त्र, निवारा, तेल,साबण,पाणी, इंधन खर्च, शैक्षणिकसामुग्री, पाठ्यपुस्तके, व्यवसाय प्रशिक्षण, आरोग्य, मनोरंजन, कर्मचाऱ्यांचे वेतन, इत्यादींवरील सर्व खर्चांचा समावेश राहील आणि रुपये ५० इतक्या अनुदानातून औषधी व प्रासंगिक खर्च आणि इतर बाबी यावरील खर्चांचा समावेश राहील.

(ब) <u>अनावर्ती अनुदान</u>

(१) फर्निचर, भांडीसामुग्री, व्यवसाय प्रशिक्षण विषयक साहित्य, भांडी-कुंडी, खाट, बिछाने असा स्वरुपाच्या बाबींकरिता प्रत्येक मुलामागे वसतीगृहास रुपये ५००/-(रुपये पाचशे फक्त) इतके अनावर्ती अनुदान प्रत्यक्ष खर्चाच्या अधिनतेने फक्त एकदाच अनुज्ञेय राहील.
(२) संस्थेने वसतीगृह इमारत बांधल्यास, प्रत्येक मुलामागे वसतीगृहास रुपये ६०००/- (रुपये सहा हजार फक्त) इतके इमारत अनुदान प्रत्यक्ष खर्चाच्या अधिनतेने फक्त एकदाच अनुज्ञेय राहील.

(क) संस्थांना विविध अनुदान मंजुरीचे अधिकार आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना राहतील. नवीन संस्थांच्या वसतीगृहांना मान्यता देण्याचे अधिकार शासनाकडे राहतील.

(तीन) योजनेखाली मंजूर वसतीगृहे

या योजनेखाली ७५ मुलांची क्षमता असलेल्या खालील वसतीगृहांना मान्यता देण्यात आली आहे.
(१) देवदासी निवारण मुक्ती केंद्र संचलित देवदासी मुलांचे वसतीगृह, गडहिंग्लज, जि.कोल्हापूर.
(२) भगिनी निवेदिता प्रतिष्ठान संचलित देवदासी मुलींचे वसतीगृह, जत, जि.सांगली.

(चार) लेखाशीर्ष

या वरील खर्च लेखाशीर्ष-२२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२-समाजकल्याण-१०३, महिला कल्याण, तीन-इतर योजना (१)(ग) -वेश्यांच्या मुलांकरिताच्या योजना (२२३५ ०५५२), मागणी क्र.एक्स-१ या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकावा व मंजूर तरतूदीतून भागवावा.

२. वरील सर्व योजनांसाठीचे विहित नमुन्यातील अर्ज आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी तयार करुन ते मुद्रीत करुन घ्यावेत व सर्व संबंधित अधिकाऱ्यांना पाठवावेत.

३. वरील सर्व योजनांच्या संदर्भात देवदासी असल्याबाबतचा दाखला नोंदणीकृत देवदासी संघटनेकडून घेण्यात यावा व असा दाखल्याची सत्यतेबाबत संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी खात्री करुन सदर दाखला प्रमाणित करावा.

४. देवदासी पुनर्वसन योजनांचा लाभ ज्या देवदासी घेतील त्यांना देवदासी म्हणून पुन्हा काम करता येणार नाही.

५. देवदासी पुनर्वसनाच्या योजना देवदासी प्रथेचे प्रमाण अधिक असल्याने त्यांच्या सर्वेक्षणात आढळून आलेल्या देवदासींचे वास्तव्य असलेल्या १० जिल्ह्यात राबविण्यात याव्यात. यामध्ये कोल्हापूर, सांगली, सोलापूर, उस्मानाबाद, नांदेड, लातूर, सिंधुदुर्ग, पुणे, मुंबई व रत्नागिरी ह्या दहा जिल्ह्यांचा समावेश राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(चंद्रसेन सुरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
मा.राज्यपालांचे सचिव.
मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव.
मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव.
सर्व मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे -१
सर्व विभागीय महिला व बाल विकास अधिकारी
सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व जिल्हाधिकारी
सर्व जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी
निवड नस्ती-का-२

परिशिष्ट-१

शासन निर्णय, महिला व बाल विकास क्र. ८४/२००१/डीआरएस-२०००/प्र.क्र.१९६/का-२, दि. १५.६.२००१ चे

परिशिष्ट-१

देवदासी पुनर्वसन योजना कार्यान्वित करण्यासाठी काढण्यात आलेल्या शासन निर्णयांची यादी

(१) शा.नि. स.क.सां.का.क्री.व प.वि.क्र.एसडब्ल्यूएफ-०८५/२९०७१/(१४२)/सोह-३, दि.८.४.८६

(२) शा.नि. स.क.सां.का.क्री.व प.वि.क्र.एसडब्ल्यूएफ-०८६/(१४८)/सोह-३, दि.१३.८.१९८६

(३) शा.नि. स.क.सां.का.क्री.व प.वि.क्र.एसडब्ल्यूएफ-०८६/२७०११/(१००)/सोह-३, दि.२९ ऑगस्ट,१९८६

(४) शा.नि. स.क.सां.का.क्री.व प. वि.क्र.एसडब्ल्यूएफ-०८७/२०१५/(८१)/सुधार-३, दि.२१.८.१९८७

(५) शा.नि.म.व बा.क.वि.क्र.डीआरएस-१०९३/प्र.क्र.३९६/का-२, दि.२९.८.१९९४

(६) शा.नि.म.व बा.क.वि.क्र.जेएसी-१०९४/प्र.क्र.४०/का-२, दि.१५.१२.१९९४

(७) शा.नि.म.व बा.क.वि.क्र.डीआरएस-१०९७/प्र.क्र.१०/का-२, दि.२.१.१९९७

(८) शा.नि.म.व बा.क.वि.क्र.डीआरएस-१०९५/प्र.क्र.२१७/का-२, दि.१२.१.१९९८

(९) शा.नि.म.व बा.क.वि.क्र.डीआरएस-१०९७/प्र.क्र.१०/का-२, दि.१४.१.१९९८

(१०) शासन शुध्दीपत्रक म.व बा.वि. वि.क्र.डीआरएस-१०९७/प्र.क्र.१०/का-२, दि.२.२.१९९८

(११) शासन परिपत्रक म.व बा.वि. वि.क्र.डीआरएस-१०९७/प्र.क्र.१०/का-२, दि.२९.१०.१९९८

(१२) शासन परिपत्रक म.व बा.क.वि.क्र.डीआरएस-१०९७/प्र.क्र.१०/का-२, दि.२.१.१९९९